ePaper
डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील आज शिवसेनेत प्रवेश करणार!

| वर्ष - 8 | अंक - 301 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज™

## आतील पानांत

- कोहलीविरूद्ध गुन्हा दाखल केला?
- रोहित भाई गार्डनमध्ये फिरतोय
- पाचवी अर्थव्यवस्था असल्याने आमंत्रण
- आपत्ती-प्रतिरोधक पायाभूत सुविधांवर भर

www.mahaenews.com | सोमवार , दि. 9 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### मत विकायला लाडकी बहीण योजना सुरु केली

# वेळ आली तर बलिदान!

## बच्चू कडूंचा इशारा; अन्नत्याग आंदोलनामुळे सरकार टेन्शमध्ये!

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**माजी मंत्री बच्चू कडू यांनी सध्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाचं अस्त्र उपसलं आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी, या मागणीला घेऊन त्यांनी अन्नत्याग आंदोलन चालू केलं आहे. मोझरी येथे ते या आदोलनाला बसले आहेत. दरम्यान, लोकांच्या डोक्यात हिदू-मुस्लीम द्वेष पेरला जात आहे. मी बलिदान द्यायला तयार आहे, पण शेतकऱ्यांचे प्रश्न सुटले पाहिजेत, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे.**



### आमच्या जीवन मरणाचा प्रश्न

अन्नत्याग आंदोलनाला बसलेले असताना बच्चू कडू यांनी भाषम केले. यावेळी बोलताना देशातील शेतकरी नेते राकेश टिकेत उद्या इथे येणार आहेत. देशात आता जातीय रंग देण्याचा काम केलं जातंय. राज्यात मराठा आणि ओबीसी वाद पेटवला गेला. त्यामुळे आमच्या जीवन मरणाचा प्रश्न मागे पडत चालला आहे, अशी टीका त्यांनी सरकारवर केली. आमच्या डोक्यात हिंदू-मुस्लीम द्वेष टाकला जात आहे. त्यावर रामबाण उपाय म्हणजे बच्चू कडू यांचे आंदोलन आहे. बाप मेला तरी चालेल पण नेता जिवंत राहला पाहिजे ही व्यवस्था मोडून काढायची आहे. आमच्या बियाण्याचे भाव का कमी झाले नाही, असा सवाल त्यांनी सरकारला केला आहे.

### शेतकऱ्यांच्या मालाचा भाव

तसेच मत विकायला लाडकी बहीण सुरू केली. पण दुसरीकडे शेतकऱ्यांच्या शेतमालाचे भाव पडले आहेत. सरकार सत्तेवर यावे यासाठी लाडकी बहीण योजना आणण्यात आली. त्याच काळात मात्र शेतकऱ्यांच्या मालाचा भाव पडला होता. सरकारला माहीत आहे की बच्चू कडू मेला तरी फ़रक पडत नाही. कारण त्यांनी जाती धर्मात लोकांना गुंतवणूक ठेवले आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

### कडोजी महाराजांच्या समाधी परिसरात बेमुदत अन्नत्याग आंदोलन

दरम्यान, आजपासून बच्चू कडू यांचे अमरावतीच्या गुरुकुंज मोझरीमध्ये तुकडोजी महाराजांच्या समाधी परिसरात बेमुदत अन्नत्याग आंदोलन चालू झाले आहे. शेतकरी, अपंग, शिक्षक, दिव्यांग, शेतमजूर, मच्छिमार यांच्या वेगवेगळ्या मागण्यांसाठी ते या आंदोलनाला बसले आहेत. त्यामुळे आता या आंदोलनाची सरकार कशी दखल घेणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेसकडून पुण्यातील निवडणुकीची तयारी

## बालगंधर्व रंगमंदिरातील मेळाव्याच्या निमित्ताने सुरुवात

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) २६ व्या वर्धापनदिनानिमित्त पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली येत्या मंगळवारी (१० जून) बालगंधर्व रंगमंदिर येथे मेळावा होणार असून, यानिमित्ताने आगामी महापालिका निवडणुकीची तयारी सुरू होणार आहे.**




पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त मंगळवारी (१० जून) सकाळी दहा वाजून दहा मिनिटांनी राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे ध्वजारोहण होईल. यानंतर सकाळी साडेदहा ते दोन यावेळेत बालगंधर्व येथे मेळावा होणार असल्याची माहिती शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी पत्रकार परिषदेत दिली. ज्येष्ठ नेते अंकुश काकडे, ॲड. जयदेव गायकवाड, रवींद्र माळवदकर, श्रीकांत पाटील, विशाल तांबे, औदुंबर खुने पाटील, उदय महाले, किशोर कांबळे, सुनील माने या वेळी उपस्थित होते.

जगताप म्हणाले, ‘वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाला पक्षाध्यक्ष शरद पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह सर्व खासदार, आमदार उपस्थित राहणार आहेत. पक्षाच्या २६ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच पुणे शहराला वर्धापनदिनाच्या यजमान पदाचा मान मिळाला आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यात साजरा होत असलेला हा वर्धापनदिन पक्षाच्या कार्यकर्त्यांना बळ देणारा, पक्षाला ताकद देणारा ठरणार आहे.’

> “ पुणे महत्त्वाचे राजकीय केंद्र असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष याठिकाणी सर्व बाजूंनी तयारीला लागला आहे. यंदाची निवडणूक पक्षासाठी प्रतिष्ठेची ठरणार असून, सर्व गटांना बरोबर घेऊन एकसंध लढण्याची रणनीती आखली जात आहे. “पुण्यात राष्ट्रवादी पुन्हा एकदा बळकट होईल, आणि मतदारांपर्यंत आमची विकासकामांची विचारधारा पोहोचवली जाईल,”
>
> –प्रभात जाधव, पुणे शहराध्यक्ष

# महापालिकेच्या जागांवर महामेट्रोचा डोळा!

## जागा महापालिकेच्या, उत्पन्न मात्र महामेट्रोला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जुन्या पुणे-मुंबई महामार्गालगत कोट्यवधी रुपये किंमत असणाऱ्या तब्बल २३ मोक्याच्या जागा पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून महामेट्रोला देण्यात येणार आहेत. त्यात दापोडी ते पिंपरी मार्गावरील ८, तर पिंपरी ते निगडी मार्गावरील १५ जागांचा समावेश आहे. त्यामुळे महापालिकेच्या जागेवर मेट्रोकडून व्यापारी संकुल उभारून दरमहा कोट्यवधींचे भाडे गोळा करत उत्पन्न मिळवले जाणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेने जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील दापोडी ते पिंपरीच्या मोक्याच्या ठिकाणी असलेल्या आठ जागा यापूर्वी ३० वर्षे भाडेतत्त्वावर महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन (महामेट्रो) दिल्या. त्या कोट्यवधी रुपये किमतीच्या जागा महामेट्रोला बिनशर्त मालकी (फ्री होल्ड) हक्काने देण्याचे आदेश राज्य शासनाने महापालिकेला दिला आहे.**



त्यामुळे आठ जागेचा मालकी हक्क आता महामेट्रो असणार आहे. पहिल्या टप्प्यात पिंपरी ते दापोडी अशी मेट्रो धावत आहे. या मेट्रो मार्गिकेसाठी महापालिकेने आठ जागा महामेट्रोला ३० वर्षांच्या भाडे तत्त्वावर दिल्या आहेत. त्या ठिकाणी पार्किंग विकसित करण्याची, व्यावसायिक उपयोग न करण्याची अट महापालिकेने घातली होती. तीस वर्षांचे एकूण भाडे रक्कम महापालिकेचा हिस्सा म्हणून महामेट्रोकडे समायोजित करण्यात येणार होते. त्यानुसार महापालिकेच्या वतीने दापोडी ते पिंपरी या मेट्रोच्या मार्गाकरिता मौजे पिंपरी येथील ३ जागा, वल्लभनगर येथील २ जागा, फुगेवाडी येथील २ जागा आणि दापोडी येथील १ जागा अशा एकूण ८ जागांचा आगाऊ ताबा महानगरपालिका सभेच्या मंजूर ठरावानुसार अटी व शर्तीवर ३० वर्षे कालावधीसाठी महामेट्रोला २०१८ साली देण्यात आलेला आहे. महामेट्रोने प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय बँकांकडून कर्ज घेतले आहे. कर्जाची नियमित परतफेड, तसेच मेट्रो संचलन, दुरुस्ती व देखभालीचा खर्च भागवण्यासाठी महापालिकेच्या त्या जागांचा व्यावसायिक कारणांसाठी वापर होणे आवश्यक आहे. त्यासाठी त्या जागा महामेट्रोला बिनशर्त मालकी हक्काने मिळाव्यात, अशी विनंती महामेट्रोने राज्य शासनाकडे केली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५० अ अन्वये राज्य शासनास प्राप्त अधिकारानुसार महापालिकेने त्या आठ जागा बिनशर्त मालकी हक्काने महामेट्रोला देण्यास नुकतीच मान्यता दिली आहे. त्या जागेच्या अधिमूल्याची रक्कम या प्रकल्पाच्या वित्तीय सहभाग आराखड्यानुसार महापालिकेने द्यावयाच्या वित्तीय सहभागामध्ये समायोजित केली जाणार आहे. या निर्णयानुसार महापालिकेने महामेट्रोला त्या आठ जागा बिनशर्त मालकी हक्काने देण्याबाबत तत्काळ कार्यवाही करावी. त्या जागा महामेट्रोने व्यावसायिक हेतूनेच वापराव्यात. जागेचा वापर न केल्यास त्या पुन्हा महापालिकेस बिनशर्त परत करण्यात याव्यात, असे राज्य शासनाच्या नगर विकास विभागाच्या आदेशात नमूद केले आहे. या निर्णयामुळे महापालिकेच्या आठ जागांची मालकी आता महामेट्रोकडे असणार आहे.

### जागा त्वरित हस्तांतर होणार

महापालिका ते निगडी या मेट्रो मार्गिकेच्या अनुषंगाने महापालिका हद्दीतील एकूण १५ जागा महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना हस्तांतरण करण्याची कार्यवाही महापालिका स्तरावर सुरू आहे. तसेच, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना जागा उपलब्ध करून देणेच्या संदर्भात दोन्ही संस्थेमधील जागा हस्तांतरणाची प्रक्रिया सुरळीतरीत्या सुरू असून, या मेट्रोमार्गात कोणताही अडथळा निर्माण झालेला नाही. महामेट्रोची स्थिरता व वित्तीय व्यवहार्यता तसेच तिकिटोत्तर उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक जमिनीचा वाणिज्यिक वापर करणे आवश्यक आहे. त्यासाठी महापालिकेच्या हद्दीत असलेल्या या जमिनी मालकी हक्काने व बिन शर्तीने महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन देण्यास शासनाने आदेशाद्वारे महापालिकेला कळवले आहे. यासंदर्भात महापालिकेच्या भूमी व जिंदगी विभागाचे सहाय्यक आयुक्त मुकेश कोळप म्हणाले, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी बिनशर्त मालकी हक्काने जागा देण्याबाबत राज्य शासन नगरविकास विभागाकडून आदेश प्राप्त झाला आहे. त्यासंदर्भातील दापोडी ते पिंपरी ८ आणि पिंपरी ते निगडी १५ अशा २३ जागेचा प्रस्ताव आयुक्तांसमोर ठेवण्यात येणार आहे. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाल्यानंतर महापालिकेचा २३ जागांची मालकी हक्क महामेट्रोला मिळणार आहे.

### पंधरा जागा महामेट्रोकडे जाणार

पिंपरी ते निगडीतील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकापर्यंत मेट्रो मार्ग विस्ताराचे काम सुरू आहे. आता पिंपरी येथील महापालिका भवन ते निगडी या मेट्रो मार्गिकेच्या कामासाठी आकुर्डी येथील ४, निगडी येथील ८ आणि चिंचवड येथील ३ अशा एकुण १५ जागा महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना हस्तांतरण करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्या मार्गिका, स्टेशनसाठी महामेट्रोला महापालिकेने १५ जागा ३० वर्षे भाडे तत्त्वावर देण्यात आल्या आहेत. त्याचे एकूण क्षेत्रफळ ४८८३.२३३ चौरस मीटर इतके आहे. त्या जागा भाडे तत्त्वाऐवजी बिनशर्त मालकी हक्काने देण्याची मागणी महामेट्रोने केली आहे.

---

# इंद्रायणीनगरच्या नाना-नानी उद्यानात बकालपणा

## परिसरात डासांची संख्या वाढली; समस्या तातडीने सोडवण्याची मागणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**इंद्रायणीनगर येथील नाना-नानी पार्कची दुरवस्था झाली आहे. लहान मुलांची खेळणी तुटली आहेत. ओपन जीमच्या साहित्यही नादुरुस्त अवस्थेत आहे. त्याचप्रमाणे येथे साचणाऱ्या पाण्यामुळे दलदल तयार झाली असून परिसरात डासांची संख्या वाढली आहे. या समस्या तातडीने सोडवण्याची मागणी होत आहे..**




भोसरीतील पेठ क्रमांक दोनमधील नाना-नानी पार्क आहे. पार्कचे प्रवेशद्वारे तुटल्याने तेथे भटक्या श्वानांचा मुक्त वावर असतो. प्रवेशद्वाराजवळील पायऱ्याही तुटलेल्या आहेत. तेथील त्रिकोणी टोकदार बांधकामामुळे ट्रॅकवरून ज्येष्ठ नागरिकांना खूपच काळजीपूर्वक चालावे लागते.

खेळण्यातील झोका, घसरगुंडी, मल्टिपल खेळणी तुटलेल्या अवस्थेत आहेत. काही लोखंडी खांब तुटलेल्या अवस्थेत असल्याने मुलांना दुखापत होण्याचा धोका आहे. खेळण्या ठेवलेल्या भागात वाळूत माती आणि दगड मिसळून ते कडक झाल्यानेही लहानग्यांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पार्कमध्ये ओपन जीमचे साहित्य बसविण्यात आले आहे. मात्र, महापालिकेने याच्या देखभालीकडे दुर्लक्ष केल्याने काही साहित्य नादुरुस्त अवस्थेत आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या तरुणांसह ज्येष्ठ नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

### पार्कमध्ये गवताचे आच्छादन

पावसामुळे काही भागातील गवत वाहून गेले. तर काही भागात दलदल झाली आहे. तेथे पाणी साचत असल्याने परिसरात दुर्गंधी आणि डासांची संख्याही वाढली आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या पार्कमधील समस्या दूर करण्याची मागणी माजी नगरसेवक संजय वाबळे, ज्येष्ठ नागरिक दत्तात्रय दिवटे, प्रकाश झा, चंद्रकांत वाघ, बशीर तरासगार, मधुकर गुंजकर, संजय करगळ आदींनी महापालिकेकडे केली आहे.

### जोडप्यांचा वावर

येथील प्रवेशद्वार तुटले आहे. तसेच सुरक्षा रक्षक नसल्याने पार्कमध्ये रात्रीच्या वेळी जोडप्यांचा वावर वाढला आहे. काही वेळा या परिसरात टवाळखोर तरुण येतात. त्यामुळे परिसरतील नागरिकांना याचा नाहक त्रास होत आहे, अशी कैफियत उद्यान परिसरातील राहणाऱ्या नागरिकांची आहे.यासंदर्भात महापालिकेचे उद्यान अधीक्षक राजेश वसावे म्हणाले, इंद्रायणीनगरातील नाना-नानी पार्कमधील विविध कामे स्थापत्य विभागाकडून करून घेण्यात येणार आहेत. खेळणी आणि जीमच्या साहित्याचीही दुरुस्ती करण्यात येणार आहे. पार्कमध्ये साचलेल्या पाण्याचा निचरा होण्यासाठी या ठिकाणी शौच खड्डा बांधण्यात येणार आहे. वॉकिंग ट्रॅकमधील त्रिकोणाकृती टोकदार बांधकाम काढून ते नव्याने बांधण्यात येईल.

## महापालिकेच्या शिक्षण विभागाने कंबर कसली

# विद्यार्थ्यांना शाळा सुरु होताच पुस्तके मिळणार!

## ‘बालभारती’कडून मोफत पाठ्यपुस्तकांचा पुरवठा

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**समग्र शिक्षा अभियानांतर्गत सर्व महापालिका, अनुदानित, विनाअनुदानित व खासगी शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना वेळेत पुस्तके मिळावीत, यासाठी महापालिकेच्या शिक्षण विभागाने कंबर कसली आहे. शिक्षण विभागाने मागणी केलेल्या पुस्तकांपैकी जवळपास १०० टक्के मोफत पाठ्यपुस्तकांचा पुरवठा ‘बालभारती’कडून करण्यात आला आहे. ही सर्व पुस्तके ‘शहर साधन केंद्रा’ पर्यंत (यूआरसी) पोहोचविण्यात आली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळा सुरू होताच पुस्तके मिळण्यास मदत होणार आहे.**



शासनातर्पेâ सर्व शिक्षा अभियानांतर्गत दरवर्षी पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके दिली जातात. यामध्ये मराठी, हिंदी, उर्दू आणि सेमी माध्यमांच्या अनुदानित शाळांचा समावेश असतो. महापालिका शिक्षण विभागाने २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी बालभारतीकडे ३ लाख ८२ हजार ४०३ पुस्तकांची मागणी केली होती. जून महिन्यात शालेय शैक्षणिक वर्षास सुरुवात होत असते. त्यामुळे जूनच्या पहिल्या आठवड्यात महापालिकेच्या पिंपरी आणि आकुर्डीच्या शहर साधन केंद्रावर पुस्तके दाखल होत असतात. या केंद्रांच्या अखत्यारितील शाळांमध्ये पुस्तके वितरित करण्यात येतात. आकुर्डी व पिंपरी केंद्रावर पुस्तके दाखल झाल्यानंतर लगेच दुसऱ्या तिसऱ्या दिवशी शाळेच्या मुख्याध्यापकांच्या ताब्यात दिली जातात. जेणेकरून शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत नवीन पुस्तक देऊन केले जाईल, शहर साधन केंद्राअंतर्गत आकुर्डीतील वैâ. वसंतदादा पाटील शाळा केंद्रासाठी विद्यालय, तर पिंपरी केंद्रासाठी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय ठेवण्यात आली आहे.

पहिलीचा अभ्यासक्रम बदललेला आहे. त्यानुसार नवीन अभ्यासक्रम असलेला पहिलीची नवीन पुस्तके छापली असून, सर्व माध्यमांची पहिलीची पुस्तके दाखल झाली आहेत. त्यामुळे महापालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडून सर्व महापालिका, शासकीय शाळा, समाज कल्याण शाळा, खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांसाठी तालुकास्तरीय प्रशिक्षण प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी २०२५-२६ पासून करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून पहिलीच्या नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी होणार आहे. या नवीन अभ्यासक्रमाबाबतचे तालुकास्तरीय प्रशिक्षण ९ ते ११ जून या कालावधीत ठिकाण प्रतिभा ज्युनिअर कॉलेज काळभोरनगर येथे सकाळी १० ते ५ या वेळेत होणार आहे, अशी माहिती प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी दिली

### आकुर्डी शहर साधन केंद्र

मराठी माध्यम - ९६,४३७
हिंदी माध्यम - २,९६५
इंग्रजी माध्यम - ४,०७५
उर्दू माध्यम - ५,०७९
सेमी इंग्रजी - ३७,४७७

### पिंपरी शहर साधन केंद्र

मराठी माध्यम -२,०१,०४९
हिंदी माध्यम - ७,५३७
इंग्रजी माध्यम - १८,७९६
उर्दू माध्यम - ८,९८८

## पीएमआरडीएच्या सौरउर्जा प्रकल्पातून विजेची बचत

## सेक्टर 12 गृहप्रकल्पातील अभिनव उपक्रम

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड - वाढत्या वीजदरांमुळे सर्वसामान्य कुटुंबांवर आर्थिक ताण येत आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) सौरऊर्जेचा वापर करून नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे. भोसरी `क्टर १२ येथील गृहप्रकल्पात सौरऊर्जेच्या माध्यमातून घरांचा सामायिक वीजखर्च तब्बल ३० टक्क्यांनी घटला आहे. जिल्ह्यातील पहिल्या नेट मीटरिंग प्रणालीयुक्त सोलर गृहनिर्माण प्रकल्पाची ही उल्लेखनीय कामगिरी आहे.**



पीएमआरडीए च्यावतीने भोसरी येथील सेक्टर १२ मध्ये उभारण्यात आलेल्या पंतप्रधान आवास योजना गृहनिर्माण प्रकल्पात सौरऊर्जेच्या माध्यमातून वीजबचतीचा नवा आदर्श निर्माण झाला आहे. या घरकुल प्रकल्पातील ४५ इमारतींमध्ये सौर पद्धतीने वीजपुरवठा करण्यात येत आहे. नेट मीटरिंगच्या सहाय्याने या सोसायट्यांना महावितरणकडून सवलतीचा लाभ मिळतो आहे. या प्रकल्पात ४ हजार ८८३ सदनिका आहेत. यापैकी ३ हजार ३१७ वन बीएचके व १ हजार ५६६ टू बीएचके सदनिका आहेत. प्रत्येक इमारतीत २ किलोवॅट क्षमतेची सोलर सिस्टम बसवण्यात आली आहे. या प्रणालीमुळे जिना, पार्किंग व सार्वजनिक भागातील लाईट्सना सौरऊर्जेवर चालणारा पर्याय मिळाला आहे. विजेच्या खर्चात तब्बल ३० टक्के कपात झाली आहे. पूर्वी दोन हजार रुपयांपर्यंत असलेले बिल आता ७०० ते ८०० रुपयांपर्यंत खाली आले आहे. या सोलर सिस्टिममुळे प्रत्येक सदनिकेला दररोज १०० लिटर गरम पाणी मिळत आहे. सध्या काही सदनिकांमध्ये रहिवासी नसल्यामुळे उर्वरित सदस्यांना त्याचा जास्त प्रमाणात फायदा होत आहे.

पीएमआरडीएच्या या प्रकल्पात सौरऊर्जेद्वारे ३० टक्क्यांहून अधिक वीजबचत होत आहे. पुणे जिल्ह्यातील नेट मीटरिंग प्रणालीयुक्त पहिल्या सौर गृहनिर्माण प्रकल्पाची ही विशेष कामगिरी आहे. सौर प्रणालीची निगा व देखभाल पीएमआरडीएचा विद्युत विभाग नियमितपणे करतो.




### प्रती इमारतीत 2 किलो वॅट क्षमतेची सिस्टीम

प्रत्येक इमारतीमध्ये २ किलोवॅट वीज जनरेट होईल, अशी सिस्टीम कार्यान्वित करण्यात आली आहे. याबाबत काही तक्रारी होत्या. मात्र त्यातील तांत्रिक अडचणी दूर केल्यानंतर त्या सक्षमतेने सुरू करण्यात आल्या असून, संबंधित सर्व यंत्रणा पीएमआरडीएच्या आख्यारित सुरू असणार आहे. त्याबाबत विद्युत विभाग स्वतंत्र देखरेख ठेवत आहे. इमारतीत उभारण्यात आलेल्या या सोलर सिस्टिमद्वारे प्रत्येक सदनिकांमध्ये १०० लिटर पाणी मिळत आहे. त्यामुळे त्यातदेखील सदनिकाधारकांच्या विजेमध्ये मोठ्या प्रमाणात बचत होत आहे. सद्यस्थितीत काही इमारतीमधील अद्याप सदनिकांमध्ये कोणी राहत नाही. त्यामुळे इतर सदस्यांना अधिक लिटर पाणी मिळत आहे.

> “सेक्टर १२ प्रकल्पातील पहिल्या टप्प्यात सर्व सौर यंत्रणा कार्यान्वित झाल्या आहेत. त्याचा थेट लाभ नागरिकांना होत असून विजेच्या खर्चात ३० टक्क्यांहून अधिक बचत होत आहे.”
> **- संजय पाटील** (कार्यकारी अभियंता-पीएमआरडीए)

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### विषयाकडचा ओढा भगवंताकडे लावावा.

प्रपंचात ज्याला विश्वास म्हणतात, त्यालाच परमार्थात श्रद्धा म्हणतात. उणीव हेच प्रपंचाचे रूप असल्यामुळे तो पूर्ण झाला असे कधीच होणार नाही. समाधान हा मात्र पूर्णत्वाचा स्वभाव आहे. निर्हेतुक कर्म करण्याने खरी सात्त्विकता उत्पन्न होईल, आणि पुढे पूर्णाहुती दिली जाईल. अशा प्रकारे ' सर्वस्व ' अर्पण करणे याचेच नाव यज्ञ होय. त्याग आणि भगवंताचे स्मरण हा यज्ञाचा खरा अर्थ होय. परमार्थ साधला की बुवाचा देह पुष्ट होतो. तो काय दुधाचा रतीब लावतो ? छे:; भगवंताच्या आनंदाने त्याचा देह भरलेला असतो. परंतु साधकावस्थेमध्ये त्याचा देह कष्टामध्येच ठेवलेला असतो. खरे म्हणजे परमार्थी माणसाने दैन्यवाणे रहायचे कारणच नाही. पैसा असेल तर त्याने रोज श्रीखंडपुरी खावी; पण उद्या जर उपास पडला तर मात्र आजच्या पक्वान्नाची आठवण होता कामा नये. सर्वांत गृहस्थाश्रम श्रेष्ठ सांगितला आहे. ज्याला हित करून घ्यायचे आहे त्याला गृहस्थाश्रमासारखा आश्रम नाही. पण लग्न करून सर्व काळ विषयांत घालवू लागलो आणि प्रपंचाची कर्तव्ये करायची राहिली तर मग लग्न करून काय साधले ? उद्योग करून पोट भरायचे हे खरे, पण नोकरी करून मालकाला सर्वस्व मानू लागलो आणि देवाला विसरलो तर नाही उपयोग. देवाला स्मरून नोकरी करावी. गृहस्थाश्रमात देव भेटणार नाही असे जो म्हणेल त्याचे खरे मानू नये. देव भेटेल याची खात्री बाळगावी. आपला भार सर्वस्वी भगवंतावर टाकावा. संकट, आनंद दोन्ही भगवंताला सांगावीत. ज्या स्थितीत भगवंताने ठेवले आहे त्या स्थितीत समाधान मानावे. अर्पणबुद्धीने सर्व कर्मे करावीत. ज्यात माझे मन मला खात नाही ते काम चांगले असे समजावे. कोणत्याही मनुष्याला जोपर्यंत या प्रपंचामध्येच सर्व काही आहे असे वाटत असते तोपर्यंत तो परमार्थापासून दूर असतो. वाईट लोक समाधानात दिसतात, पण खरे ते तसे नसतात. वाईट कृत्ये करणाऱ्याला कधी ना कधी तरी पश्चात्ताप झाल्यावाचून राहत नाही. एखादी बाई आपल्या सावत्र मुलाला ज्याप्रमाणे खायला-प्यायला घालते पण आतून तिचे त्याच्यावर प्रेम नसते, त्याप्रमाणे आपण परमार्थाला वागवतो. खरे म्हणजे आपले इथेच चुकते. आपला ओढा जो विषयाकडे आहे, तो भगवंताकडे लावला की परमार्थ साधला. ज्याने विषयातले सुख भगवंताकडे लावले, म्हणजे भगवंताच्या स्मरणात ज्याला सुखा-समाधानाचा लाभ झाला, त्याचे जन्माला येऊन खरे कल्याण झाले.

**बोधवचन: प्रपंचात जी आपली चिकाटी आहे. तिच्या एकचतुर्थांश चिकाटी जरी भगवंतासाठी आपण धरली, तरी आपले काम भागेल.**



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# 'युक्रेन'च्या युद्धतंत्राचा पासवर्ड : स्पायडर वेब!

**रशिया आणि युक्रेन यांच्यामधील युद्ध दिवसेंदिवस अधिकच चिघळत चालले आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की हे दोघेही सूडाने अक्षरशः पेटले असून युद्धाचा शेवट फार भयानक होणार, असे स्पष्ट चित्र आहे. युक्रेनने रशियावर आत्तापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला चढवला. यामध्ये रशियाचे प्रचंड नुकसान झाले असून युक्रेनच्या आत्मघाती ड्रोन्सनी रशियाच्या वायुदलाची ४१ लढाऊ विमाने नष्ट केली, किंबहुना, त्यांचा कोळसा केला. यातील एका विमानाची किंमत साधारण तीन हजार कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, यावेळी युक्रेनने वापरलेल्या अत्याधुनिक युद्धतंत्राने संपूर्ण जग अवाक् झाले आहे, हे नक्की ! काय आहे हे अत्याधुनिक युद्धतंत्र ? त्याचा पासवर्ड आहे..स्पायडर वेब !**



### रशियाची ४१ विमाने बेचिराख..

रशियाची ४१ विमाने, त्यांचे विमानतळ आणि क्रूझ क्षेपणास्त्रे बेचिराख करण्यासाठी युक्रेनने जे तंत्र वापरले ते म्हणजे 'स्पायडर वेब' ! आणि हीच तर आता बदलत्या युद्धतंत्राची नांदी म्हणावी लागेल ! युक्रेनने रशियाच्या हद्दीत तब्बल ४००० किलोमीटर आत घुसून गेल्या आठवड्यात केलेल्या ड्रोन हल्ल्यांनी, पारंपारिक युद्धतंत्र कालबाह्य ठरून नव्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित युद्धतंत्राचा वापर यशस्वी झाल्याने आता संपूर्ण युद्धतंत्रच पुनर्मांडणीच्या उंबरठ्यावर असल्याची जाणीव जगाला झाली आहे. युक्रेनच्या या नवीन युद्धतंत्रामुळे संपूर्ण जगच आश्चर्यचकीत झाले आहे. यापुढे युद्धनीती आणि कूटनीती कशी वापरायची याचे ठोकताळेच बदलले, तर आश्चर्य वाटून देऊ नका !

### युक्रेनने काय केले ?

युक्रेनने अनेक ट्रक्समधे लाकडी खोक्यांमधे ठेवलेले ड्रोन्स रशियाच्या हद्दीत, त्यांच्या लष्करी तळांच्या जवळपास नेऊन उभे केले. 'रिमोट कंट्रोल' ने ट्रकचे छत आणि लाकडी खोक्यांची झाकणे उघडून ड्रोन अचूक लक्ष्यभेद करतील, याची त्यात बसवलेल्या कॅमेऱ्यातील चित्रिकरण पाहत खात्री करून रशियाची थोडी थोडकी नव्हे तर ४१ विमाने जमिनीवरच नष्ट केली, या महागड्या विमानांचा कोळसा बघत बसण्या पलीकडे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्या हातात काहीच राहिले नाही !

### युक्रेनचे दीड वर्षे काटेकोर नियोजन..

प्रचंड गोपनीयता पाळून गेले दीड वर्षे अत्यंत काटेकोर नियोजन करीत युक्रेनने रशियन हद्दीत खोलवर शिरून अचानक केलेल्या या ड्रोन हल्ल्यात रशियाचे लाखो कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा युक्रेनने केला असून तो खरा असल्याची जगाची खात्री झाल्याने प्रचंड खळबळ उडाली आहे. त्या धक्क्यातून अनेक देश अजूनही सावरले नाहीत.

### युक्रेनचा अत्यंत विध्वंसक हल्ला

या अत्यंत विध्वंसक हल्ल्यात युक्रेनने वापरलेल्या ड्रोन्सची संख्या फक्त १२४ असल्याचे समजते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे ड्रोन्स तयार करायला प्रत्येकी फक्त पंचवीस हजार रुपये इतकाच खर्च येतो, असे संरक्षण तज्ज्ञांचे म्हणणे आहे. अत्यंत कमी खर्च करून शत्रूचे प्रचंड प्रमाणावर नुकसान करणे, हे त्यामुळेच युक्रेनला सहज शक्य झाले आहे. त्यांनी त्यासाठी मात्र दीड वर्षे अत्यंत बारकाईने आणि काटेकोरपणे नियोजन केले आणि त्यासाठी प्रचंड गोपनीयताही पाळली.

### काय म्हणाले होते डोनाल्ड ट्रम्प?

अजूनही अनेकांना आठवत असेल, की अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प असेही म्हणाले होते, की अमेरिकेचा हात डोक्यावर नसेल, तर झेलेन्स्की आणि त्यांचा युक्रेन रशियापुढे एका आठवड्यात गुडघे टेकेल. प्रत्यक्षात, अमेरिकेच्या दबावाला मुळीच भीक न घालता झेलेन्स्की यांनी हा ड्रोन हल्ला घडवून आणला आणि रशियाच्या वायूदलाची ३४ टक्के क्षमताच नष्ट करून टाकली आहे ! लष्कराची आकडेवारी, सैनिकांची संख्या, अत्यंत महागडी संरक्षण सामग्री, त्यातच कॉम्प्युटरची मोठी मदत आणि त्यासाठी कोणत्याही सरकारला करावी लागणारी प्रचंड गुंतवणूक, या सगळ्या कल्पनांना छेद देणारे हे युक्रेनचे आक्रमण आहे.

### यापुढे युद्धतंत्र वेगाने बदलेल..

युक्रेनच्या या आक्रमणावर रशियाचा प्रतिसाद काय असेल, त्यांनी काय पावले उचलली आहेत, जबरदस्त धक्क्यातून ते सावरले आहेत का ? हे लवकरच कळेल, पण येथून पुढे युद्धतंत्र तंत्रज्ञानाच्या प्रभावाने अत्यंत वेगाने बदलेल, असे स्पष्ट संकेत मिळत आहेत. यापुढे सैनिक संख्या, रणगाड्यांसारखी अवजड यंत्रसामुग्री यांचा प्रभाव कमी होऊन अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि अत्यल्प खर्चात निर्माण करता येणारी भेदक शस्त्रे, अस्त्रे यांचे वर्चस्व युद्धतंत्रावर राहील, असे संरक्षण विषयक तज्ज्ञांना वाटत आहे आणि ते खरेच आहे.

### ड्रोन्सचा रशियातील प्रवास आश्चर्यकारक !

युक्रेनने ड्रोन्सची वाहतूक ज्या ट्रक्समधून केली, ते ट्रक इतक्या मोठ्या संख्येने रशियन हद्दीत तपासणी न करता दोन ते चार हजार किलोमीटर प्रवास कसे करू शकले ? याचेच आश्चर्य वाटते, भल्याभल्यांसाठी ते न सुटणारे कोडेच आहे. कदाचित रशियामधील काही अधिकाऱ्यांना युक्रेनने फोडले असावे, असा काहींचा संशय आहे. त्याबाबत अत्यंत गोपनीयता पाळली गेली असून युक्रेनचे राष्ट्राध्यक्षच त्याचे उत्तर देऊ शकतील. 'आर्टिफिशियल ईंटेलिजन्स' म्हणजेच 'एआय' चा वाढता प्रभाव या जगाचा चेहरामोहरा येत्या दोन पाच वर्षांत पुरता बदलून टाकेल, अशी लक्षणे दिसत आहेत

### ड्रोनच्या रचनेत बदल..

आपल्याकडे क्रिकेट, फुटबॉलसारख्या सामन्यांसाठी, विवाह सोहळ्यांचे हवेतून चित्रिकरण करण्यासाठी किंवा अलीकडे कीटकनाशकांची पीकावर फवारणी करण्यासाठी आपण वापरतो, तशा ड्रोनच्या रचनेत काही बदल करून युक्रेनने रशियात प्रचंड विध्वंस घडवला, हे पाहता यापुढे ड्रोन्सच्या वापरावर अनेक कायदेशीर निर्बंध येतील, असे त्यामुळेच वाटू लागले आहे. अत्यंत कमी खर्चामध्ये शत्रूचा प्रचंड विध्वंस हे नवे युद्धतंत्र अतिशय लोकप्रिय होणार आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पक्ष आपल्यालाच चालवायचाय!

## पाहुणे येतात, जातात; भाजप आमदार बबनराव लोणीकर यांचे वक्तव्य

।जालना। 
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पाहुणे येतात आणि जातात. परंतु भारतीय जनता पक्ष एकनिष्ठ कार्यकर्त्यांनाच चालवायचा आहे, असे वक्तव्य आमदार बबनराव लोणीकर यांनी अन्य पक्षांमधून आलेल्यांना उद्देशून रविवारी येथे केले.मोदी सरकारची अकरा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल जालना जिल्हा भाजप कार्यालयात रविवारी पार पडलेल्या कार्यकर्त्यांच्या कार्यशाळेत बोलताना ते म्हणाले, सध्या आपल्या पक्षात पाहुण्यांची गर्दी झाली आहे. मंत्रिमंडळात गर्दी झाली आहे. गावपातळीवरही पाहुण्यांची गर्दी झाली आहे. परंतु, पक्ष आपल्यालाच चालवायचा आहे, हे एकनिष्ठ कार्यकर्त्यांनी लक्षात ठेवावे.**



भाजपचे जालना मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी पुन्हा एकदा पक्षातील "पाहुणे" म्हणजे नव्या किंवा दुसऱ्या पक्षांमधून आलेल्या सदस्यांविरोधात कडक भूमिका पत्करली आहे.

येथील जिल्हा कार्यालयात त्यांनी "पाहुणे येतात आणि जातात; भाजप एकनिष्ठ कार्यकर्त्यांनाच चालवायचा आहे" असे स्पष्ट मत मांडले जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद आणि अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपला सामना कदाचित मित्रपक्षांसोबतही होऊ शकतो, असे सांगून लोणीकर म्हणाले, मित्रपक्षांची साथ मिळाली नाही तर आपण स्वबळावर निवडून येण्याची तयारी ठेऊ. जिल्हा परिषदेत भाजपचे तीस सदस्य निवडून आले तर सत्तेसाठी आपल्याला कुणाच्याही कुबड्यांची गरज भासणार नाही.

### लोणीकर यांचे मार्गदर्शन

रावसाहेब दानवे यांचे वर्चस्व असलेल्या भाजपच्या जिल्हा कार्यालयात गेली काही वर्षे लोणीकर यांचे जाणे-येणे नसल्यासारखेच होते. मोदी सरकारला अकरा वर्षे झाल्यानिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी अनेक महिन्यांनंतर त्यांचे या कार्यालयात मार्गदर्शन झाल्याचे जिल्हा पातळीवरील भाजपच्या एका पदाधिकाऱ्याने सांगितले. दानवे पिता-पुत्र मराठवाड्याबाहेर मोदी सरकारला ११ वर्षे झाल्याच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमास रावसाहेब दानवे आणि आमदार संतोष दानवे अनुपस्थित होते. रावसाहेब दिल्लीत असल्याने तर संतोष दानवे पंचायतराज विधिमंडळ समितीच्या दौऱ्यानिमित्त मराठवाड्याच्या बाहेर असल्याने हजर नव्हते, असेही पक्षाच्या एका पदाधिकाऱ्याने सांगितले.

त्यासाठी कदाचित आपल्यासमोर मित्रपक्षांचेही आव्हान असू शकेल.

### रावसाहेबांसोबतचे मतभेद पक्षाच्या चौकटीतील

रावसाहेब दानवे आणि आपल्यात पाच-सहा वर्षे पक्षांतर्गत काही मतभेद होते. परंतु, ते पक्षातील चौकटीत होते. आम्ही दोघांनी ठरविले तर जालना महानगरपालिका भाजपच्या ताब्यात येऊ शकते.

आगामी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काही गावांत पक्षातील कार्यकर्त्यांत मतभेद असतील तर ते मिटवून टाका, असे आवाहनही आमदार लोणीकर यांनी केले.

# महामार्गाच्या कामातील दिरंगाई

## उपाययोजनांची मागणी; आ. अतुल भोसलेंची केंद्र सरकारकडे धाव

।पुणे। 
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बंगळुरू महामार्गावरील कराड शहरालगत सहापदरीकरण कामातील उड्डाणपूल व रस्त्याचे रुंदीकरण दीर्घकाळ रेंगाळल्याने प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होत असून, परिणामी अपघातांचे प्रमाण वाढल्याची बाब गांभीर्याने घेऊन आमदार डॉ. अतुल भोसले यांनी दिल्लीत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाला महामार्गाच्या कामातील दिरंगाईच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.**



कराडलगत महामार्गावरील अपूर्ण कामामुळे वाहनांची गर्दी वाढली असून, काही ठिकाणी गंभीर अपघात. काही अपघातांमध्ये दुर्दैवाने जीवितहानीही झाली आहे. महामार्गावरील वाहतूक सुरळीत आणि सुरक्षित राहणे ही स्थानिक नव्हे, तर राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब असल्याचे मत डॉ. भोसले यांनी व्यक्त केले.

नवी दिल्लीत केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांचे विशेष कार्यकारी अधिकारी अमोल पाटील यांची डॉ. भोसले यांनी भेट घेतली. त्यांना आपल्या मागणीचे निवेदन सादर करत अपघातांचे वाढते प्रमाण, वाहतूक कोंडी आणि कामातील दिरंगाईबाबत चिंता व्यक्त केली. काम सुरू असणे स्वागतार्ह असले तरी, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आल्याने प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज डॉ. भोसले यांनी व्यक्त केली.

डॉ. भोसले यांनी महामार्गावर सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाय म्हणून वाहतूक नियंत्रणासाठी अधिक कर्मचारी नेमणे, अपघात टाळण्यासाठी गतिरोधक बसविणे, मार्गदर्शक फलकांची संख्या व स्पष्टता वाढविणे व रात्रीच्या वेळी दृश्यता वाढविण्यासाठी पुरेसे पथदिवे बसविणे आदी उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी या निवेदनात आहे.

### थेट दिल्ली दरबारी धडकले

दरम्यान, आजवर खासदार उदयनराजे भोसले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आदी प्रभावी नेत्यांनी पुणे-बंगळुरू महामार्गाचे रेंगाळलेले सुसज्जीकरण आणि ठेकेदार कंपनीची मनमानी याविरुध्द आवाज उठवला. संबंधित यंत्रणा, ठेकेदार कंपनीचे अधिकारी यांना धारेवर धरले होते. त्यावेळच्या बैठकीतील सूचनांना संबंधितांनी जुमानले नव्हते. त्यामुळे सर्वांच्या भावना तीव्र बनल्या होत्या. अशात स्थानिक आमदार डॉ. अतुल भोसले हे थेट दिल्ली दरबारी धडकल्याने त्याचा प्रभाव किती राहतो, सध्याची ही जटील समस्या सुटते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

निवेदनाची गंभीर दखल घेत अमोल पाटील यांनी तत्काळ राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि संबंधित डी. पी. जैन कंपनीच्या अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनीवरून आवश्यक सूचना केल्या. मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत संबंधित अधिकाऱ्यांची तातडीने बैठक घेण्याचे आश्वासनही पाटील यांनी डॉ. भोसले यांना दिले. आमदार डॉ. अतुल भोसले यांनी महामार्गावरील वाहतूक व नागरिकांचे जीवित सुरक्षित ठेवण्यासाठी हे काम वेळेत पूर्ण होणे आवश्यक असून, नागरिकांच्या जीवाशी खेळ होण्याआधी उपाययोजना होणे गरजेचे असल्याचे सांगितले.

# मणिपूर पुन्हा अशांत!

## मैतई नेत्याच्या अटकेनंतर हिंसक आंदोलन; जमावबंदी लागू

। इम्फाळ ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज।

**मैतई समाजाची संघटना असलेल्या 'अराम्बाई टेंगल'च्या नेत्याला अटक झाल्यानंतर मणिपूरमध्ये हिंसक आंदोलनाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे राज्य प्रशासनाने रविवारी इम्फाळ खोऱ्यातील पाच जिल्ह्यांमध्ये प्रतिबंधात्मक आदेश लागू केले. जमावबंदी आणि इंटरनेट सेवा बंद केल्याने राज्यात दिवसभरात तणावपूर्ण स्थिती होती.**




मणिपूरमध्ये २०२३ मध्ये झालेल्या हिंसाचाराशी संबंधित विविध गुन्हेगारी कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या आरोपावरून रविवारी इम्फाळ विमानतळावर अराम्बाई टेंगल संघटनेच्या कानन सिंग यांना अटक करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) मणिपूर हिंसाचार प्रकरणांची चौकशी करत आहे. त्यामुळे सीबीआयने कानन सिंग यांना अटक केली. मात्र या अटकेनंतर इम्फाळ खोऱ्यात मैतई समाजाने हिंसक आंदोलनाला सुरुवात केली. मैतई नेत्याच्या सुटकेची मागणी करत आंदोलकांनी क्वाकेइथेल आणि अरिपोकमध्ये रस्त्यांवर टायर आणि जुने फर्निचर जाळले. इम्फाळ शहरात विविध भागांत पोलीस व सुरक्षा दलाच्या कर्मचाऱ्यांशी आंदोलकांची झटापट झाली. इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील खुराई लामलोंग येथे जमावाने एका बसला आग लावली. राजभवनापासून जवळजवळ २०० मीटर अंतरावर असलेल्या कांगला गेटसमोर आंदोलकांना पांगवण्यासाठी सुरक्षा दलांनी अश्रुधुराच्या अनेक नळकांड्या सोडल्या. राजभवनाकडे जाणाऱ्या रस्त्यांवर अतिरिक्त केंद्रीय दल तैनात करून सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यात आली आहे. आंदोलन करणाऱ्या काही जणांना ताब्यात घेतले असून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पाच जिल्ह्यांमध्ये जमावबंदीचे आदेश लागू केले आहेत. या जिल्ह्यांमध्ये व्हीएसएटी आणि व्हीपीएन सुविधांसह इंटरनेट व मोबाइल सेवा निलंबित करण्यात आल्या आहेत. काठ्या, दगड, बंदूक किंवा धारदार शस्त्रे बाळगण्यास बंदी घातली असून असे आढळल्यास कारवाई करण्यात येत आहे.

गेल्या वर्षी मणिपूरमध्ये सुरक्षा दलांवर झालेल्या प्राणघातक हल्ल्यांशी संबंधित प्रकरणात राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) तीन बंडखोरांना अटक केली. या तिघांनी त्यांच्या साथीदारांसह १७ जानेवारी २०२४ रोजी तेंग्नौपाल जिल्ह्यातील मोरेह येथे इंडियन रिझर्व्ह बटालियन (आयआरबी) चौकी आणि सुरक्षा दलांवर कट रचून हल्ला केला, असा आरोप त्यांच्यावर लावण्यात आला आहे. अटक केलेल्या आरोपींमध्ये कुकी इंपी तेंग्नौपाल (केआयटी) या बंडखोर गटाचा सदस्य थांगमिनलेन मतेचा याचा समावेश आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### आमदारांची राज्यपालांशी चर्चा

राज्यात वाढलेल्या हिंसाचाराबाबत मणिपूरच्या आमदारांच्या शिष्टमंडळाने रविवारी संध्याकाळी राज्यपाल अजयकुमार भल्ला यांची भेट घेतली. दोन वर्षांपूर्वी मणिपूरमध्ये झालेल्या वांशिक हिंसाचारप्रकरणी एकूण पाच जणांना अटक करण्यात आली असून त्यापैकी अराम्बाई टेंगल संघटनेच्या एका नेत्याला सीबीआयने अटक केली आहे, असे आमदार के. इबोमचा यांनी बैठकीनंतर सांगितले.

---

# 'विकासासाठी महिला सशक्तीकरण महत्त्वाचे'

## पंतप्रधानांचे प्रतिपादन; 'मोदी सरकार'ला आज 11 वर्षे पूर्ण

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गेल्या ११ वर्षांमध्ये आपल्या सरकारने महिलाकेंद्रित विकासाला महत्त्व दिले असून सर्व क्षेत्रांमध्ये देशातील महिला चांगली कामगिरी करून अनेकांना प्रेरणा देत असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले.**



गेल्या ११ वर्षांमध्ये आपल्या सरकारने महिलाकेंद्रित विकासाला महत्त्व दिले असून सर्व क्षेत्रांमध्ये देशातील महिला चांगली कामगिरी करून अनेकांना प्रेरणा देत असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले. मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारला आज, सोमवारी ११ वर्षे पूर्ण होत आहेत. त्याच्या पूर्वसंध्येला 'एक्स' समाजमाध्यमावर लिहिलेल्या संदेशात पंतप्रधानांनी विविध योजनांवर प्रकाश टाकला.

महिलांना मोठा फायदा झालेल्या अनेक कल्याणकारी कार्यक्रमांचा उल्लेख करतानाच 'स्वच्छ भारत' मोहिमेद्वारे प्रतिष्ठा सुनिश्चित करण्यापासून ते जनधन खात्यांद्वारे आर्थिक समावेशापर्यंत, विविध उपक्रम महिला सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित करत असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. विज्ञान, शिक्षण, क्रीडा, स्टार्टअप्स आणि सशस्त्र दलांसह सर्व क्षेत्रात महिला उत्कृष्ट कामगिरी करत आहेत आणि अनेकांना प्रेरणा देत आहेत, असे पंतप्रधान म्हणाले.

पंतप्रधानांनी सरकार चालवणाऱ्या नागरिक सहभाग असलेल्या व्यासपीठाचा दाखला दिला. यात अनेक सरकारी योजनांमधून महिलांना मिळणाऱ्या फायद्यांची यादी देण्यात आली होती. उज्ज्वला गॅस कनेक्शन योजनेंतर्गत १० कोटींहून अधिक कनेक्शन देण्यात आल्याची माहितीही त्यांनी या वेळी दिली.

### 'थेट उत्तरे देण्याची हिंमत नाही'

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याजवळ पत्रकारांच्या थेट प्रश्नांना उत्तरे देण्याची हिंमत नसल्याचा आरोप काँग्रेसने रविवारी केला. प्रत्येक देशाचे प्रमुख वेळोवेळी पत्रकार परिषदा घेतात. परंतु आपल्या पंतप्रधानांना थेट प्रश्नांना तोंड देऊन ११ वर्षे झाली, असा टोला काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी 'एक्स'वर लगावला.

> 'उज्ज्वला योजने'मुळे गरीब कुटुंबांना गॅस सिलिंडरवर चालणारे धुरमुक्त स्वयंपाकघर मिळाले, तर 'मुद्रा' कर्ज योजनेमुळे लाखो महिला उद्योजकांना स्वत:च्या अटींवर स्वप्ने पूर्ण करता आली. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महिलांच्या नावावर बांधलेल्या घरांचाही उल्लेखनीय परिणाम झाला. 'बेटी बचाओ बेटी पढाओ' कार्यक्रमाने मुलींच्या संरक्षणासाठी राष्ट्रीय चळवळ प्रज्वलित केली.
>
> –नरेंद्र मोदी, पंतप्रधान

# रवीना टंडनच्या लेकीचं दत्तक बहिणींबद्दल वक्तव्य

९० च्या दशकात अनेक सुपरहिट चित्रपटांमधून प्रेक्षकांचं मनोरंजन करणारी अभिनेत्री म्हणजे रवीना टंडन होय. रवीना अवघी २१ वर्षांची असताना तिने दोन मुली दत्तक घेतल्याने तिच्यावर कौतुकाचा वर्षाव झाला होता, तर काहींनी मात्र नकारात्मक टिप्पण्या केल्या होत्या. रवीनाच्या या मुली आता मोठ्या झाल्या आहेत, तसेच तिची स्वतःची मुलं राशा व रणबीरही मोठी झाली आहे. राशाने दत्तक बहिणींबद्दल वक्तव्य केलं आहे, ती काय म्हणाली? जाणून घेऊयात.रवीना टंडन फक्त २१ वर्षांची होती, जेव्हा तिने पूजा व छाया या मुलींना दत्तक घेतलं होतं. त्यानंतर काही वर्षांनी तिने २००४ मध्ये अनिल थडानीशी लग्न केलं. अनिल व रवीनाला राशा व रणबीर ही दोन अपत्ये झाली. रवीना एकदा म्हणाली होती की पूजा व छाया रणबीर आणि राशा यांच्यासाठी मोठ्या बहिणी आहेत. आता राशाने एका मुलाखतीत दोन्ही दत्तक बहिणींबरोबरच्या नात्याबद्दल भाष्य केलं. चार भावंड जेव्हा एकत्र असतो तेव्हा दोन टीम होतात. ज्यात छाया आणि रणबीर एका बाजूला असतात आणि पूजा व राशा दुसऱ्या टीममध्ये असतात, असं राशाने सांगितलं.राशा फेमिनाला दिलेल्या मुलाखतीत म्हणाली की ती चार भावंड एकत्र असतात तेव्हा खूप वेडेपणा करतात. "फक्त आणि फक्त वेडेपणा. छाया दीदी आणि रणबीर कदाचित थोडे शांत आहेत.

# अमिताभ बच्चन यांनी ती पोस्ट नेमकी का केली

महानायक अमिताभ बच्चन सोशल मीडियावर खूप सक्रिय आहेत. ते अनेकदा सोशल मीडियावर पोस्ट करत असतात. त्यांनी ७ फेब्रुवारी रोजी एक पोस्ट केली होती. तीन शब्दांची त्यांची पोस्ट पाहून चाहते काळजीत पडले होते. अमिताभ बच्चन यांनी ती पोस्ट नेमकी का केली होती, याचा खुलासा त्यांनी स्वतःच केला आहे. अमिताभ बच्चन सोशल मीडियावर त्यांच्या वैयक्तिक आयुष्यासोबतच व्यावसायिक आयुष्याशी संबंधित गोष्टी चाहत्यांशी शेअर करत असतात. ते अनेकदा त्यांच्या एक्स अकाउंटवर अशा पोस्ट करतात ज्या खूप व्हायरल होतात.बिग बींनी ७ फेब्रुवारीला अशीच एक पोस्ट केली होती. त्यात "जाण्याची वेळ झाली..." असं त्यांनी लिहिलं होतं. त्यांची ही पोस्ट पाहून चाहत्यांची चिंता वाढली होती. आता त्यांनी ही पोस्ट का केली होती, याबद्दल मौन सोडले आहे.अमिताभ बच्चन ८२ वर्षांचे असून या वयातही ते काम करत आहेत. चित्रपट असो किंवा शो, ते उत्साहाने शूटिंग करताना दिसतात. अचानक त्यांनी 'जाण्याची वेळ झाली' अशी पोस्ट केल्याने नेमकं काय घडलंय, ते कशाबद्दल बोलत आहेत अशी चर्चा सुरू झाली. बिग बी चित्रपट आणि 'कौन बनेगा करोडपती'मधून निवृत्ती घेत आहेत की त्यांची तब्येत ठीक नाही, असे एक ना अनेक प्रश्न लोकांना पडले होते. आता 'कौन बनेगा करोडपती 16' चा एक नवीन प्रोमो समोर आला आहे. या प्रोमोमध्ये अमिताभ बच्चन त्या पोस्टबद्दल बोलताना दिसत आहेत. शोमधील अनेक लोक त्यांना अनेक प्रश्न विचारतात.

# किआरा आई होणार



'कबीर सिंग'मधील प्रीती अर्थात किआरा अडवाणी आई होणार आहे. सिद्धार्थ मल्होत्रा व किआरा अडवाणी यांनी इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करून ही आनंदाची बातमी दिली आहे. लग्नानंतर दोन वर्षांनी हे दोघेही आपल्या पहिल्या बाळाचं स्वागत करणार आहेत. किआरा व सिद्धार्थ यांच्या लग्नाला ७ फेब्रुवारीला दोन वर्षे झाली. आता त्यांच्या आयुष्यात नवीन सदस्य येणार आहे. किआरा व सिद्धार्थ यांनी एक फोटो शेअर करून ही गुड न्यूज शेअर केली आहे. दोघांनी हातात बाळाच्या मोचे पकडलेला एक फोटो पोस्ट केला आहे. त्या फोटोबरोबर एक क्युट कॅप्शन देत त्यांनी ही बातमी चाहत्यांबरोबर शेअर केली आहे."आमच्या आयुष्यातील सर्वात मोठे गिफ्ट... लवकरच येत आहे," असं कॅप्शन किआराने या फोटोला दिलं आहे. किआराने हा फोटो पोस्ट केल्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.किआरा व सिद्धार्थ यांनी 'शेरशाह' चित्रपटात एकत्र काम केलं होतं. या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान किआरा व सिद्धार्थ यांच्यातील जवळीक वाढली आणि ते खऱ्या आयुष्यात प्रेमात पडले. त्यानंतर ते एकमेकांना डेट करू लागले. काही वर्षे डेट केल्यावर दोघांनी ७ फेब्रुवारी २०२३ रोजी राजस्थानमध्ये जैसलमेर येथे सूर्यगढ पॅलेसमध्ये मोठ्या थाटामाटात लग्न केलं होतं. लग्नाचा दुसरा वाढदिवस सेलिब्रेट केल्यानंतर काही दिवसांनी आता त्यांनी आई-बाबा होणार असल्याची बातमी शेअर केली आहे. सिद्धार्थ व किआरा दोघांचेही चाहते व सिनेविश्वातील सेलिब्रिटी अभिनंदन करत आहेत.वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाल्यास तर किआरा लवकरच रणवीर सिंहबरोबर 'डॉन ३' मध्ये दिसणार आहे.

# मराठमोळ्या दिग्दर्शकाच्या घरी लगीनघाई



बॉलीवूडमध्ये लगीनघाई सुरू आहे. नुकताच रणबीर कपूर, करीना कपूर यांच्या आत्याचा मुलगा व अभिनेता आदर जैन गर्लफ्रेंड अलेखा अडवाणीबरोबर लग्न बंधनात अडकला. आता एका मराठमोळ्या दिग्दर्शकाच्या मुलाच्या लग्नाची तयारी सुरू आहे. 'जोधा अकबर'सह अनेक सुपरहिट बॉलीवूड चित्रपटांचे मराठमोळे दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांचा मोठा मुलगा लवकरच गर्लफ्रेंडशी लग्न करणार आहे. आशुतोष व सुनीता गोवारीकर यांचा मुलगा कोणार्क गोवारीकर २ मार्च रोजी लग्नबंधनात अडकणार आहे. कोणार्क नामांकित रिअल इस्टेट डेव्हलपर रसेश बाबुभाई कनकिया यांची कन्या नियती कनकियाशी लग्न करणार आहे. कोणार्क व नियती यांच्या लग्नाचा सोहळ्या भव्यदिव्य असेल. या लग्नात सेलिब्रिटींसह उद्योगविश्वातील नामांकित उद्योगपती हजेरी लावतील. तसेच या कोणार्क व नियती दोघांचे कुटुंबीय, नातेवाईक व मित्र-मैत्रिणी या लग्नात उपस्थित राहणार आहेत.कोणार्क गोवारीकरबद्दल बोलायचं झाल्यास तो त्याच्या वडिलांबरोबर काम करतोय आणि चित्रपट निर्मितीचे बारकावे शिकत आहे. तो त्याच्या वडिलांप्रमाणेच चित्रपट उद्योगात काम करण्यास उत्सुक आहे. आशुतोष व सुनीता गोवारीकर यांना दोन मुलं आहेत. कोणार्क हा थोरला मुलगा असून धाकट्या मुलाचे नाव विश्वांग गोवारीकर आहे.आशुतोष गोवारीकर यांनी दिग्दर्शनाबरोबरच अभिनयातही पाऊल ठेवलं आहे. ते शेवटचे 'मानवत मर्डर्स'मध्ये झळकले होते. त्याचबरोबर 'काला पानी' या वेब सीरिजमध्येही त्यांनी मोठी व महत्त्वपूर्ण भूमिका साकारली होती. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या शेवटच्या सिनेमाबद्दल बोलायचं झाल्यास तो 'पानीपत' होता. या चित्रपटात अर्जुन कपूर, क्रिती सेनॉन, संजय दत्त हे कलाकार होते. २०१९ साली आलेला हा ऐतिहासिक चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला होता. आशुतोष गोवारीकर यांनी आतापर्यंत 'लगान', 'स्वदेस', 'जोधा अकबर', 'मोहेंजोदारो', 'बाजी', 'पानीपत' असे अनेक चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. यापैकी बहुतांशी चित्रपट सुपरहिट ठरले होते. आशुतोष गोवारीकर त्यांच्या भव्यदिव्य चित्रपटांसाठी ओळखले जातात.

# कंगना - जावेद अख्तर यांच्यातील वाद मिटला



बॉलीवूड अभिनेत्री कंगना रणौत व दिग्गज लेखक जावेद अख्तर यांच्यातील अनेक वर्षांपासून सुरू असलेला कायदेशीर खटला अखेर संपला आहे. दोघांनी हे कायदेशीर प्रकरण सोडवले आहे. कंगनाने सोशल मीडियावर जावेद अख्तर यांच्याबरोबरचा एक फोटो शेअर करून चाहत्यांना याची माहिती दिली आहे. शुक्रवारी, दोघे मुंबईतील वांद्रे येथील न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर राहिले आणि त्यांनी पाच वर्षे जुना वाद सोडवला. जावेद अख्तर आणि कंगना रणौत २८ फेब्रुवारीला सकाळी १०.३० वाजता त्यांच्या वकिलांसह वांद्रे कोर्टात पोहोचले. तिथे त्यांनी मॅजिस्ट्रेट आशिष आवारी यांच्यासमोर पाच वर्षे जुनं कायदेशीर प्रकरण संपवलं.कंगनाने इंस्टाग्राम स्टोरीवर जावेद अख्तर यांच्याबरोबर एक फोटो शेअर केला आणि लिहिलं, "आज, जावेद जी आणि मी मध्यस्थीद्वारे आमचे कायदेशीर प्रकरण (मानहानी प्रकरण) सोडवले आहे. जावेद जी यांनी मोठं मन ठेवून हे प्रकरण सोडवले. तसेच मी दिग्दर्शन करत असलेल्या माझ्या पुढच्या चित्रपटासाठी गाणी लिहिण्यासही त्यांनी होकार दिला आहे."कंगना रनौत व जावेद अख्तर यांच्यातील ही कायदेशीर लढाई २०२० मध्ये सुरू झाली होती. कंगनाने एका मुलाखतीत २०१६ मध्ये जावेद अख्तर यांच्याबरोबर झालेल्या भेटीची आठवण सांगितली होती. कंगना आणि हृतिक रोशनचे २०१६ मध्ये ब्रेकअप झाले होते, ज्यामुळे दोघांमध्ये बराच वाद झाला होता. रोशन कुटुंबाच्या जवळ असलेल्या जावेद अख्तर यांनी हृतिक रोशनची माफी मागण्यास सांगितलं होतं, असा दावा कंगनाने केला होता.२०२१ मध्ये एका मुलाखतीत कंगना म्हणाली होती की, २०१६ मध्ये झालेली बैठक त्यांना अपमानजनक वाटली. त्यामुळेच त्यांनी तिच्याविरुद्ध मानहानीचा दावा करीत न्यायालयात धाव घेतली आहे. कंगना रणौतनेदेखील जावेद अख्तर यांच्याविरुद्ध न्यायालयात खटला दाखल केला होता. मात्र, अख्तर यांच्यावरील कारवाईला दिंडोशी सत्र न्यायालयाने स्थगिती दिली होती.

# कार्लोस अल्काराझ लाल मातीचा राजा!

## साडेपाच तासांच्या झुंजार लढतीत सिनरवर केली मात

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जागतिक क्रमवारीतील नंबर १ टेनिसपटू यानिक सिनर आणि स्पेनचा खेळाडू कार्लोस अल्काराझ या दोघांमध्ये फ्रेंच ओपन स्पर्धेचा अंतिम सामना पार पडला. या सामन्यात दोन्ही युवा खेळाडूंमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. शेवटी कार्लोस अल्काराझने बाजी मारत जेतेपदाचा मान पटकावला आहे.**






हा सामना सामन्यात अल्काराझने ४-६,६-७ (४-७), ६-४ (७-३), ७-६ (१०-२)अशा फरकाने जिंकला. सिनर आणि अल्काराझ या दोन्ही खेळाडूंमध्ये तोडीस तोड लढत पाहायला मिळाली. पहिल्या सेटमध्ये दोघांमध्ये १२ मिनिटं लढत पाहायला मिळाली. या सेटमध्ये सिनरने बाजी मारली. सिनरने पहिला सेट ६-४ ने आपल्या नावावर केला. सिनरने पहिल्या दोन सेटमध्ये विजय मिळवून आघाडी घेतली. त्यानंतर तिसऱ्या सेटमध्ये अल्काराझने दमदार कमबॅक केलं. अल्काराझने हा सेट आपल्या नावावर केला. चौथ्या सेटमध्ये दोघांमध्येही चुरशीची लढत पाहायला मिळाली. सिनरने या सेटमध्ये ५-४ ने आघाडी घेतली होती. हा सामना जिंकण्यासाठी आवश्यक असलेले ३ गुण त्याच्याकडे होते. मात्र, इथेच अल्काराझने आपल्या खेळाचा दर्जा दाखवला. लागोपाठ ३ मॅच पॉईंट वाचवून त्याने गेम आपल्या नावावर केला. टायब्रेकरमध्ये अल्काराझने बाजी मारली आणि निर्णय पाचव्या गेमपर्यंत पोहोचवला.

या सामन्यात सिनरला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानलं जात होतं. सिनर या लढतीत आघाडीवर होता. मात्र, अल्काराझनेही आपला खेळाचा दर्जा दाखवला आणि हातून निसटलेला अंतिम सामना आपल्या नावावर केला. सिनर आणि अल्काराझ दोघेही युवा खेळाडू आहेत. मात्र, या दोघांमध्ये झालेल्या अंतिम सामन्याची इतिहासात नोंद झाली आहे. हा सामना फ्रेंच ओपन स्पर्धेच्या इतिहासातील सर्वाधिक वेळ चाललेला सामना ठरला आहे. या सामन्याचा निकाल साडेपाच तासांनंतर लागला आहे. मात्र,शेवटपर्यंत दोघांमध्ये जेतेपदासाठी कडवी झुंज सुरू होती. २१ व्या शतकात फ्रेंच ओपन स्पर्धेचे जेतेपद राखणारा अल्काराझ हा तिसराच पुरूष टेनिसपटू ठरला आहे.

कार्लोस अल्काराझने सेमीफायनलमध्ये झालेल्या सामन्यात लॉरेन्जो मुसेटीला ३-१ ने पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश केला. या सामन्यात मुसेटीला रिटायर्ड व्हावं लागलं होतं. हा सामना देखील शेवटच्या सेटपर्यंत गेला होता. तर दुसरीकडे सिनरने स्टार खेळाडू नोवाक जोकोविचला पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश केला होता. हा सामना त्याने ६-४, ७-५, ७-६ (७-३) ने आपल्या नावावर केला.

### इतिहासात नोंदलेले रेकॉर्ड्स

फ्रेंच ओपन इतिहासातील सर्वात लांब चाललेला पुरुष एकेरी अंतिम सामना. अल्काराझ – राफा नदालनंतर लाल मातीवर स्पेनसाठी नवा राजा २१ व्या शतकातील फक्त तिसरा पुरुष टेनिसपटू ज्याने फ्रेंच ओपनचं विजेतेपद पटकावलं. कार्लोस अल्काराझने आपल्या करिअरमधील आणखी एक भक्कम टप्पा गाठला आहे. लाल मातीवरील ही झुंजार कामगिरी पाहता तो केवळ आजचा नव्हे, तर भविष्यातील टेनिस विश्वाचा चमकता तारा ठरणार हे निश्चित!

# श्रेयसने माझ्या कानाखाली मारायला हवी होती

## शशांक सिंगचे अय्यरबाबत मोठे वक्तव्य; म्हणाला, "माझे वडील बोलत नव्हते

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जाब किंग्सचा संघ आयपीएलचे जेतेपद पटकावण्यापासून एक पाऊल मागे राहिला. आयपीएल २०२५ च्या अंतिम सामन्यात पंजाब किंग्जला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध पराभव स्वीकारावा लागला. आयपीएलच्या अंतिम सामन्यात पंजाब किंग्जच्या खेळाडूंची कामगिरी खूपच खराब राहिली आणि त्यामुळे संघ १८ वर्षांनंतर पहिल्यांदा जेतेपद पटकावण्यात यशस्वी ठरला. मात्र, या अंतिम सामन्यानंतर पंजाब किंग्जचा फलंदाज शशांक सिंगने खुलासा केला आहे.**

शशांक सिंगने संघाचा कर्णधार श्रेयसबद्दल असं काही म्हटलंय की ज्यामुळे सर्वांनाच आश्चर्य वाटलं. या हंगामाच्या अंतिम सामन्यात शशांक सिंगने शानदार अर्धशतक झळकावले, परंतु तो त्याच्या संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. यामुळे पंजाब किंग्जचे त्यांचे पहिले आयपीएल ट्रॉफी जिंकण्याचे स्वप्न भंगले.

आयपीएल २०२५ च्या क्वालिफायर २ मध्ये पंजाब किंग्जने मुंबई इंडियन्सविरुद्ध विजय मिळवला आणि अंतिम फेरीतील आपले स्थान पक्के केले. पण या सामन्यात शशांक सिंगने मोठी चूक केली होती. संघाला त्याची सर्वात जास्त गरज असताना तो धावबाद झाला. यावेळेस श्रेयस अय्यर मैदानावरच त्याच्यावर संतापला होता. याशिवाय सामन्यानंतर हात मिळवतानाही श्रेयस त्याच्यावर चांगलाच वैतागला होता.

शशांक सिंगने नुकत्याच दिलेल्या इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या एका मुलाखतीत याबाबत वक्तव्य केले आहे आणि तो म्हणाला श्रेयसने जे केलं ते योग्य केलं. मला असंच हवं होतं. शशांक सिंग श्रेयस त्याच्यावर संतापला होता याबाबत सांगताना म्हणाला, "बरोबर होतं. अय्यरने तर




माझ्या कानाखाली मारायला हवी होती. अंतिम सामन्यापर्यंत माझे वडिलही माझ्याशी बोलत नव्हते. मी खूप कॅज्युअल होतो. मी त्यावेळेस गार्डनमध्ये पण नाही बीचवर चालत फिरत होतो. तो सामन्यातील खरंच महत्त्वाचा टप्पा होता. श्रेयसने मला सांगितलं मला तुझ्याकडून अशा गोष्टींची अपेक्षा नाहीये, पण नंतर तो मला डिनरसाठी घेऊन गेला."

मुंबई इंडियन्सविरुद्ध क्वालिफायर २ मध्ये शशांक सिंगला मोठी धावसंख्या उभारता आली नसली तरी, त्याने आयपीएल २०२५ च्या अंतिम सामन्यात स्फोटक फलंदाजी केली आणि नाबाद ६१ धावा केल्या. त्याच्या या खेळीचे चाहत्यांनी कौतुक केले. पण, शशांक त्याच्या संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरला.

### राजकीय वर्तुळात खळबळ

या विधानामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. शशांक सिंग यांच्या या वक्तव्यातून अय्यर प्रकरणात अनेक अनुत्तरित प्रश्नांची उत्तरे मिळू शकतात, अशी शक्यता वर्तवली जात आहे शशांक सिंग यांनी याआधी अय्यरबाबत फारशी प्रतिक्रिया दिली नव्हती. मात्र आता त्यांनी उघडपणे बोलण्याचा निर्णय घेतल्यामुळे या प्रकरणाला वेगळीच कलाटणी मिळण्याची चिन्हे आहेत. आगामी काही दिवसांत ते आणखी कोणते खुलासे करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
। सोमवार ।
। दि. 9 जून 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती





Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+ NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+ CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+ 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+ TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+ 13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

CERTIFICATION COURSE BY MORAYA SHIKSHAN SANSTHA, CHINCHWAD



शिक्षणाबरोबरच सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडविणारी शाळा

2025-26
ADMISSIONS
OPEN

प्रज्वलितो ज्ञानमयो प्रदीपः
"यत् भावो – तत् भवति"

# मोरया शिक्षण संस्था, चिंचवड
# डिप्लोमा इन मॉन्टेसरी आणि नर्सरी शिक्षक प्रशिक्षण






* राष्ट्रीय स्तरावर वैध प्रमाणपत्र
* प्रात्यक्षिकवर भर,
* ग्रंथालय सुविधा
* अध्यापन शास्त्राबद्दलची माहिती
* बाल मानसशास्त्र व पोषण आणि खूप काही..

* शुल्क: १६,०००/- (२ हप्त्यांसह)
* १ सेमिस्टर कोर्स
* अभ्यासक्रम कालावधी: १५ जून २०२५ ते १५ डिसेंबर २०२५
* वेळ : सकाळी १० ते दुपारी २

प्लॉट क्र. 13, मोरया कॉलनी, सुदर्शन नगर, गोलांडे राम मंदिरासमोर, चिंचवड, पुणे 33

संपर्क
सुचित्रा आपटे - ९३२५१३२४०२
भाग्यश्री पंडित - ८०८७७०६१००


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292